# मेट्रो-३ रेल्वे प्रकल्पाचे ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण

मुंबई, ता. ३१ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ रेल्वे मार्गाचे काम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे सुरू आहे. या प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ५३ किलोमीटर म्हणजेच ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. तर, मेट्रोसाठी प्रवासीभिमूख सुविधांची बांधकामे ७० ते ९० टक्के पूर्ण झाली आहेत.

मेट्रो-३ च्या कामांनी वेग घेतला असून टनेल बोरिंग मशीनद्वारे भुयारीकरणाचे काम जोरात सुरू आहे. हे काम अंतिम टप्प्यात आहे. नुकताच मेट्रो-३च्या महालक्ष्मी स्थानकावर भुयारीकरणाचा ४०वा टप्पा यशस्वीरित्या पार पडला. तानसा-१ या रॉबिन्स बनावटीच्या टनेल बोरिंग



मशीनद्वारे सायन्स म्यूझियम स्थानक ते महालक्ष्मी स्थानक हा डाऊन-लाईन मार्गाचा १ हजार १३५.५ मीटर भुयारीकरणाचा टप्पा एकूण ७५७ रिंग्सच्या सहायाने पूर्ण करण्यात आला. तर इतर सुविधांमध्ये बेस स्लॅबचे काम ९४ टक्के, तिकीट भागाचे काम ८२ टक्के, प्लॉट रुमचे ७१ टक्के आणि छप्पराचे ७२ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.